|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||
# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-Accredited

## परीक्षा व मूल्यमापन विभाग

जा.क्र. कबचौउमवि/७अ/१९४५/२०१९ दि. १५/०४/२०१९

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
कवयित्री बहिणाबाई चौधरी
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगावशी संलग्नित
सर्व महाविद्यालये /मान्यताप्राप्त परिसंस्था.

**विषय:- परीक्षा प्रक्रिया सुरळित, कॉपीविरहित व भयमुक्त वातावरणात पार पाडणेबाबत.**

महोदय,

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगावशी संलग्नित सर्व महाविद्यालये /मान्यताप्राप्त परिसंस्था येथे मार्च/एप्रिल /मे २०१९ च्या परीक्षा दिनांक २६ मार्च २०१९ पासून सुरु झालेल्या आहेत. परीक्षा सुरळितपणे व कॉपीविरहित वातावरणात पार पडण्याच्या दृष्टीकोनातून विद्यापीठाने प्रत्येक परीक्षा केंद्रावर अंतर्गत व बहिस्थ पर्यवेक्षक नेमलेले आहेत. त्याच बरोबर भरारी पथक सुध्दा नेमलेले आहेत. परंतु गेल्या काही दिवसांपासून काही परीक्षा केंद्रांवर कॉपी करणाऱ्या विद्यार्थ्यांकडून बहिस्थ पर्यवेक्षक किंवा भरारी पथकाच्या सदस्यांना धमकावणे , त्यांच्यावर हल्ला करणे किंवा अर्वाच्य भाषेत बोलणे असे प्रकार झाल्याचे वृत्तपत्रातून प्रसिध्द बातम्या वरुन व दक्षता पथकाच्या सदस्यांनी कळविल्यावरुन समजते.

परीक्षा सुरळितपणे कॉपी मुक्त वातावरणात पार पडण्यासाठी अभियान राबवितांना विद्यार्थ्यांकडून कनिष्ठ व वरीष्ठ पर्यवेक्षक किंवा भरारी पथकाच्या सदस्यांना धमकावणे, अर्वाच्य बोलणे असे प्रकार व कोणताही त्रास होणार नाही, किंवा त्यांच्या जिवीतास धोका होणार नाही. याची काळजी महाविद्यालयीन प्रशासनाने घेतली पाहिजे. किंबहुना ही आपली जबाबदारी आहेच. यासाठी खबरदारी म्हणून खालील प्रमाणे उपाय योजना करावी.:-

१) परीक्षेस प्रविष्ट नसलेले बहिस्थ व माजी विद्यार्थी परीक्षा सुरू असतांना महाविद्यालयाच्या प्रांगणात/आवारात विनाकारण प्रवेशीत होणार नाही, याची दक्षता घ्यावी.
२) सर्वच विद्यार्थ्यांकडे महाविद्यालयाचे चालू शैक्षणिक वर्षाचे ओळखपत्र असणे आवश्यक आहे.
३) परीक्षार्थी विद्यार्थ्याजवळ विद्यापीठ परीक्षेचे प्रवेश पत्र (Hall Ticket) असणे बंधनकारक आहे.
४) परीक्षा कक्षात प्रवेश देण्यापूर्वी विद्यार्थ्यांची तपासणी करुन आक्षेपार्ह कागदपत्रे काढून घ्यावीत. तसेच परीक्षा कक्षात भ्रमणध्वनी नेण्यास परवानगी देण्यात येऊ नये.
५) महाविद्यालयात वरिष्ठ प्राध्यापकाचे अंतर्गत दक्षता पथक नेमून अनुचित प्रकार घडणार नाहीत, यासाठी उपाययोजना करणे आवश्यक आहे.
६) महाविद्यालयात घडणारे अनुचित प्रकार थांबविण्यासाठी स्थानिक पोलीस प्रशासनास विनंती करुन त्यांचे सहाय्य घ्यावे व परीक्षा शांततेत व कॉपीमुक्त वातावरणात सुरळितपणे पार पाडाव्यात.
७) सर्व कनिष्ठ /वरिष्ठ पर्यवेक्षक व भरारी पथकांना संपूर्ण संरक्षण व त्यांना विश्वास देणे आवश्यक आहे.
८) तसेच विद्यापीठाने परीक्षा सुरु होण्यापूर्वी वेळोवेळी निर्गमित परिपत्रके व पत्रान्वये परीक्षा विषयक योग्य ते मार्गदर्शक सुचना कळविण्यात आलेल्या आहेतच. त्यानुसार काटेकोरपणे पालन होऊन अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

परीक्षा प्रक्रिया सुरळित, कॉपीविरहित व भयमुक्त वातावरणात पार पडण्याच्या दृष्टीकोनातून कडक उपाययोजना करुन विद्यापीठास सहकार्य करावे.

आपला विश्वासू,

**(भ.प्र. पाटील)**
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

पत्र पेटी .: ८०, उमवि, जळगांव दूरध्वनी .: (०२५७) २२५८४०७,२२५७३०१ ते २२५७३०५ फॅक्स .: (०२५७) २२५८४०७
Post Box No.: ८०, Umavinagar,Jalgaon, Telephone No: (०२५७)२२५८४०७,२२५७३०१ to २२५७३०५, Fax No : (०२५७) २२५८४०७